**स. क्रि. केस नं.१५४/२०१९**

**निशाणी – ५७ लगत**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक – ०१ मी शपथपूर्वक सांगतो कि –</u>**

**माझे नाव –** सचिन मधुकर पवार

**वय** – ३२, **व्यवसाय**– सचिव, वडी विकास सेवा संस्था

**राहणार**– पळशी, ता. खटाव, जि. सातारा.

**<u>फिर्यादीतर्फे वकिल श्री.यु.एस.यादव यांचे तर्फे साक्षीदारचा सरतपास शपथेवर –</u>**

१. मी सन २०११ पासून वडी विकास सेवा संस्थेत कार्यरत आहे. वडी गावचे किरण भिंताडे, बाळकृष्ण भिंताडे, दादासो भिंताडे व कमल भिंताडे माझ्या परीचयाचे आहेत. ते आमच्या संस्थेचे सभासद आहेत. किरण भिंताडे यांचे एकत्र कुटूंब असून त्यांनी आमच्या संस्थेकडे शेतघर बांधण्याकरीता कर्ज प्रकरण केले होते. कमल भिंताडे या किरणच्या आई व दादासो आणि बाळकृष्ण त्यांचे भाऊ आहेत. आमची संस्था हा सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक शाखा पुसेसावळी व कर्जदार किरण भिंताडे यांच्यातील दुवा आहे. एखाद्या सभासदाने कर्जप्रकरण आमच्याकडे केल्यानंतर आम्ही ते पुढे बँकेला पाठवतो. त्याचप्रमाणे किरण भिंताडे यांच्या कुटूंबियांनी आमच्या संस्थेकडे कर्ज प्रकरण केले होते, त्याची कागदपत्रे मी आज आणली आहेत. त्यांनी आमच्याकडे पाच लाख रुपयांची मागणी केली होती. त्याप्रमाणे कर्ज मंजूर होवून र.रु.५,००,०००/– हे किरण, कमल, दादासो व बाळकृष्ण यांना अदा केले. त्यामध्ये कमलला १,४०,०००/–, दादासोला १,२०,०००/– बाळकृष्णला १,२०,०००/– व किरणला १,२०,०००/– अदा केले. त्यावेळी कर्जप्रकरणावर

त्यांच्या सह्या माझ्यासमक्ष घेतल्या आहेत. मी त्या सह्या ओळखू शकतो.

२. माझ्याकडे दिनांक १५/०६/२०१८ रोजीचे कर्ज मंजूरीचे पत्र आहे ते मी आज आणले आहे. साक्षीदारास निशाणी ५५ सोबत कागदयादीमधील दिनांक १५/०६/२०१८ रोजीचे कर्जप्रकरण मंजूरीपत्र दाखविले. त्यावर व्यवस्थापक यांची सही आहे. दिनांक १५/०६/२०१८ रोजी कार्यकारी समिती सभेत सभासदांच्या कर्जप्रकरण मंजूरीवर सह्या घेतल्या. (साक्षीदारास निशाणी ५५ सोबत कागदयादी मधील दिनांक १५/०६/२०१८ रोजीचा कार्यकारी समिती सभा असे नाव नमुद असलेला कागद दाखविला.) त्यावर कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण यांच्या सह्या आहेत. तसेच माझी सही आहे. त्यावर संस्थेचे चेअरमन संदीप शिवाजी येवले यांची सही आहे. कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण यांनी केलेल्या सह्या माझ्या समक्ष केल्या असल्याने मी त्या ओळखतो. या कागदातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **निशाणी ५८** देण्यात येते.

३. ज्या सभासदाला कर्ज द्यायचे आहे त्याचा ७/१२ उतारा आम्ही घेतो. या कर्जप्रकरणात देखील कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण यांचे ७/१२ उतारे मी घेतले आहेत. त्यांनी गट नं.४४९ चा वडी गावचा ७/१२ दिला होता. त्या ७/१२ वर कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण या चौघांची व इतर सह हिस्सेदारांची नावे नमुद आहेत. मी त्यांच्याकडून ई–करारपत्र देखील करुन घेतले. मुळ ई–करारपत्र तलाठ्यांकडे दिले जाते व त्याची कार्बनप्रत आमच्याकडे ठेवली जाते. त्यानंतर त्यांच्या मिळकतीवर बोजा चढविला जातो.

४. आम्ही कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण यांना रक्कम रु.५,००,०००/– अदा केली आहे. ती रक्कम त्यांच्या बचत खात्याला हस्तांतरीत केली आहे. त्यांच्या घराच्या उताऱ्याला आम्ही बँकेचा बोजा चढवला आहे. तसा बोजा नोंद असलेला उतारा मी याकामी आणलेला आहे. त्याची सत्यप्रत निशाणी ५५ सोबत असलेल्या कागदयादीमध्ये दाखल केली असल्याने त्या सत्यप्रतीस **निशाणी ५९** देण्यात येते. आमचेकडे आलेले कर्जप्रकरण आम्ही बँकेकडे देतो व तेथून मंजूरी मिळाल्यानंतर कर्जाची रक्कम कर्जदारास दिली जाते. मी आज साक्षीसमन्सने न्यायालयात उपस्थित आहे.

**आरोपींतर्फे वकील श्री.एम.एम.शिंदे यांचे मार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु–**

५. मी एकाच संस्थेत सचिव म्हणून काम करतो. आमची नियुक्ती जिल्हास्तरीय समितीमार्फत केली जाते. हे खरे की, आमचे कामकाज जिल्हास्तरीय समिती व ए.आर.ऑफिस मार्फत केले जाते. हे खरे की, कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण यांचे एकत्र कुटूंब आहे असे दाखविणारा माझ्या शब्दाव्यतिरीक्त पुरावा नाही. हे खरे की, त्यांचे घरचे व्यवहार एकत्रीत आहेत कि स्वतंत्र आहेत याची मला माहिती नाही. हे खरे की, कर्जाची अदा केलेली रक्कम ही फिर्यादीला आम्ही अदा केलेली नाही. हे खरे की, आमच्या संस्थेमार्फत पिक कर्ज, मध्यम मुदतीचे कर्ज अशी कर्ज दिली जातात. हे खरे की, सोसायटीत शेतकरी सभासद असेलतरच त्याला कर्ज दिले जाते. निशाणी ५८ वरील पत्र हेड ऑफिसमधून आलेले आहे. हे खरे नाही की, त्यातील मजकूर मला व्यक्तिशः माहिती नाही. हे खरे नाही की, कमल, दादासो, बाळकृष्ण व किरण यांनी

कर्जमंजूरीकरीता अर्ज केल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो. मी आज साक्षीला येण्याकरीता आमच्या संस्थेत अगर वरीष्ठ कार्यालयात कोणताही पत्रव्यवहार केला नाही. हे खरे की, साक्षीला येताना तसे वरीष्ठ कार्यालयात आम्हाला कळवावे लागते. हे खरे की, तसा वरीष्ठ कार्यालयाचा आदेश मी आज आणलेला नाही.

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ११/०८/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.

**निशाणी – १२ लगत**

**<u>आरोपीतर्फे वकीलांनी निशाणी १५ येथे अर्ज दाखल करुन आरोपीची ओळख आव्हानित करणार नाही असे लिहून दिल्याने साक्षीदाराचा पुढील सरतपास सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री. वाय.जे.चन्ने यांचे तर्फे सुरु –</u>**

२. मी आरोपीला पाहिल्यास ओळखेन.

**<u>आरोपीतर्फे वकील श्री.आर.व्ही.सावंत यांचेमार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरु</u>**

३. मी सन २०१९ ते सन २०२३ पर्यंत कडेगांव येथे कार्यरत होते. त्यावेळी कार्यालयीन वेळ ९.४५ ते ६.१५ अशी होती. आम्हाला शनिवार व रविवारी सुट्टी असायची. त्यावेळी मी इस्लापूर ते कडेगांव असे जावूनयेवून करायचे.

४. हे खरे की, मला तहसिलदार यांनी आदेश दिला होता. (साक्षीदारास तहसिलदार कडेगांव यांनी दिलेला दिनांक २५/०६/२०२१ रोजीचा आदेश दाखविण्यात आला.) आदेशाला निशाणी १४ देण्यात येते. आदेशानुसार भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ नुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

५. दिनांक २७/०६/२०२१ पुर्वी मी आरोपीला पाहिले नव्हते. आरोपी हिंगणगांव येथे ॲग्रीकल्चर कॉलेजवर प्राध्यापक म्हणून व जनप्रवास दैनिकात पत्रकार म्हणून काम करतात अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, कोरोना काळात त्यांनी प्रशान जनतेची व्यवस्थित काळजी घेत नाही म्हणून बातम्या दिल्या होत्या म्हणून त्यांच्या विरुध्द खोटी केस दाखल केली.

६. मी तक्रार देण्यापुर्वी तहसिलदार यांचेसोबत चर्चा केली होती. मला

तहसिलदार यांनी मला तक्रार कशी द्यायची हे सांगितले नव्हते. घटनेच्या ठिकाणी बॅनर्स, पोस्टर्स होते अगर कसे मला सांगता येणार नाही. घटनास्थळावर कोण राजकीय नेते आले होते या प्रश्नाला साक्षीदाराने आमदार साहेब आले होते बाकीचे कोण आले होते असे उत्तर दिले. हे खरे की, वांगी गावातील लोकांनी आमच्या कमिटीकडे तक्रार केली नव्हती.

७. मी पोलीस स्टेशनला ८.०० वाजता गेले त्यानंतर घरी ९ ते १० वाजता गेले असेन. माझ्यासोबत पोलीस ठाणेत पथक आले होते. त्यावेळी पोलीसांनी पथकातील लोकांचे जबाब घेतले नव्हते. हे खरे की, दिनांक २७/०६/२०२१ नंतर मी घटनास्थळी परत गेले नाही. हे खरे नाही की, सरतपासात कथन केलेला संपुर्ण मजकूर खोटा कथन केला आहे.

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. १३/०७/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव